# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०६-०१-२०१८ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक ०६ जानेवारी २०१८ रोजी (दिनांक ०३.०१.२०१८ ची तहकूब सभा का.प.क्र ०५) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी २.०५ वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम.मुगळीकर भाप्रसे, नगर सचिव, श्री डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १३. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १४. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १५. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १६. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १७. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १८. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १९. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २०. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २१. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २२. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २३. | स.स. श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |
| २४. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २५. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २६. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |

| | |
|---|---|
| २७. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २८. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| २९. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३०. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |
| ३१. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३२. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३३. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३४. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३५. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३६. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३७. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३८. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ३९. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४०. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४१. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४२. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४३. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४४. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४५. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४६. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४७. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४८. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ४९. | स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५०. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५१. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५२. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५३. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५४. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५५. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५६. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५७. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५८. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ५९. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६०. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६१. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६२. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |

| | |
|---|---|
| ६३. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६४. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६५. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६६. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ६७. | स.स. श्री.सोहेल शकील शेख |
| ६८. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ६९. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७०. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७१. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७२. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७३. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७४. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७५. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७६. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ७७. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ७८. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ७९. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८०. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८१. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ८२. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ८३. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ८४. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

मा.महापौर :तीन तारखेला विशेष सभा तहकुब करण्यात आली होती, ती सभा आज घेण्यात येत आहे.

**विषय क्रमांक १९५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील विकास योजना रस्त्याने बाधीत मालमत्ता निष्काषीत करणे, रस्त्यावर अनाधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या हातगाड्यांवर तात्काळ प्रतिबंधात्मक कारवाई करणे. अनाधिकृत बांधकामाच्या विरुध्द तात्काळ कारवाई करणे बाबत.

**संवाद:-**

श्री.राजगौरव वानखेडे :तीन तारखेला ही सभा शहरातले वातावरण खराब असल्यामुळे आणि मा.आयुक्तही उपस्थित नसल्यामुळे तहकुब करण्यात आली होती. आज ही विशेष सभा घेण्यात येत आहे. औरंगाबाद शहरात स्क्वेअरचे जे अतिक्रमण डीपी रोडवर हॉकर्सच्या संदर्भामध्ये आहे. त्यावर चर्चा करणार आहे. परंतु त्या

अगोदर दमडी महल येथील डीपी रोडवरील श्रीराम पवार यांचे अतिक्रमण काढण्यात आले. त्यावर चर्चा व्हावी. आमची भुमिका अतिक्रमण करण्या संदर्भात नाही. ते अतिक्रमण पाडत असतांना प्रशासनाने पाडले की विरोधी पक्षाने पाडले हे कळायला मार्ग नाही. पण अतिक्रमण पाडत असतांना ज्या घटना घडल्या आहेत. असे काय झाले होते की दमडी महल येथील अतिक्रमण काढतांना विरोधी पक्षाला बळी पडुन त्या गरीबांचे घर पाडण्यात आले. Video clip मध्ये बघण्यात आले की, श्री.फिरोज खान अधिकाऱ्यांशी अतिक्रमण तोडण्याच्या बाबतीत गैर वर्तणुक करत आहे. म्हणजे प्रशासन त्यांच्या दबावाला बळी पडुन ते अतिक्रमण तोडण्यात आले आहे का? अनेक डीपी रोडवर अतिक्रमण झाले. त्याकडे प्रशासनाचे लक्ष नाही, मग तेच अतिक्रमण कसे तोडण्यात आले? याच्या अगोदर सुध्दा विरोधी पक्ष नेत्यांनी अधिकाऱ्यांवर दमदाटी केलेली आहे. त्यांचा प्रस्ताव पण शासनाला पाठवलेला आहे. आमची अशी स्पष्ट मागणी आहे, की त्यावेळेस कोणत्याही पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना शिवीगाळ केली असेल त्यांच्यावर कलम ३५३ नुसार कार्यवाही झाली पाहिजे आणि त्यांचे नगरसेवक पद रद्द झाले पाहिजे. तसा प्रस्ताव शासनाला पाठवण्यात यावा आणि मागे जो श्री.फेरोज खान यांचा प्रस्ताव पाठवण्यात आला होता, त्याचा सुध्दा खुलासा प्रशासनाने सभागृहात करावा.

मा.महापौर :दमडी महल सारखे इतरही काही अतिक्रमणाचे विषय आहेत. हा सुध्दा एक महत्वाचा विषय आहे. परंतु संपुर्ण सभागृहाची चर्चा झाल्यानंतर हा विषय घेणार आहोत. प्रशासनाकडुन जे खुलासे मागवले आहेत, त्याचा ही खुलासा केला जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे :आमचा अतिक्रमणाला विरोध नाही. पण ज्या पध्दतीने अतिक्रमण काढले ते पाडल्यानंतर जे फटाके फोडण्यात आले आणि विरोधी पक्ष नेत्यांनी प्रशासनावर दबाव टाकून ते अतिक्रमण पाडण्यात आले आहे. यास आमचा विरोध आहे. ते एक हिंदु व्यक्तीचे घर होते म्हणुन पाडण्यात आले का?

श्री विकास एडके :सदरील अतिक्रमणा बाबत स्थायी समितीमध्ये निर्णय देण्यात आला होता. त्यासंदर्भात श्री.गजानन बारवाल यांचे मी अभिनंदन करतो. आणि जे projector दाखवणार आहोत ते नियमात आहेत का?

मा.महापौर :या सभागृहामध्ये चेअर पर्सन व पीठासीन अधिकारी म्हणुन हा संपुर्ण पणे माझा अधिकार आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :श्री.राजगौरव वानखेडे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या अनुषंगाने प्रशासनाकडुन काही खुलासे करण्यात यावे. श्रीराम पवार यांचे अतिक्रमण महानगरपालिकेच्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी निष्काषित केले आहे. नेमकी ती जागा कोणाची होती? ते अतिक्रमण काढत असतांना ते बांधकाम अनधिकृत आहे याच्यासाठी काढले, की ते बांधकाम महानगरपालिकेच्या जागेवर आहे याच्यासाठी काढले, की ते बांधकाम डीपी plan रोडमध्ये येत होते याच्यासाठी काढले. नेमके ते अतिक्रमण कशासाठी काढले? ते अतिक्रमण काढण्यासाठी आताच श्री.विकास एडके यांनी सांगितले की, श्री.बारवाल यांनी आदेशित केले

होते. परंतु याच्या अगोदर किती तरी आदेश श्री.बारवाल साहेबांनी दिले होते, त्याचे काय झाले? मग आताच्या आदेशावर लगेचच कार्यवाही कशी झाली? अतिक्रमणाच्या बाबतीत शहरामध्ये सगळ्याच नगरसेवकांच्या तक्रारी आहेत. शहरामधल्या सगळयाच रस्त्यांवर हातगाड्या उभ्या आहेत. यांच्यावर महानगरपालिका प्रशासन कोणत्याच प्रकारची कार्यवाही करत नाही. या अगोदरच्या मिटींगमध्ये श्रीराम पवार यांच्या अतिक्रमणा बाबतीत सभागृहामध्ये चर्चा झाली होती. यावेळी जिल्ह्याचे मा.जिल्हाधिकारी उपस्थित होते, त्यांनी सांगितले होते की ही जागा महसुलची आहे. मग महसुलने महानगरपालिकेला पत्र दिले होते का? याचा सुध्दा खुलासा होणे अवश्यक आहे. शहागंज सिटी चौक जे डीपी रोड मागच्या डीपी plan मध्ये घेतलेले आहे, त्याच्यामध्ये काही जागा ॲक्वायर केलेली आहे. त्याच्यावर पण मोठया प्रमाणात अतिक्रमण झ ााल्याचे आढळुन येत आहे. ज्यांच ४० वर्षापासुन तेथे घर होत, त्यांच्याशी प्रशासनाने कोणत्या प्रकारची चर्चा केली होती का? या अतिक्रमणाच्या बाबतीत मा.कोर्टाचा पण आदेश होता की, जे काही डीपी plan मध्ये येते. त्याचे इमप्लिमेंन्ट करायचे असेल, तर ती जागा महानगरपालिका घेण्यासाठी कायदेशिर जी प्रक्रिया आहेत त्या पुर्ण कराव्यात. असा मा.न्यायालयाचा आदेश होता. शहरामध्ये कोणाचेही अतिक्रमण असेल ते पुर्ण पणे काढले गेले पाहिजे. परंतु अतिक्रमण काढतांना त्या अतिक्रमण करणाऱ्याची जात कोणती आहे हे पाहून कार्यवाही होऊ नये. आता पर्यंत महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने किती हात गाड्यांवर कार्यवाही केली? किती हातगाड्या जप्त केल्या? त्याची सुध्दा माहिती सभागृहात देण्यात यावी. जे काही दमडी महलचा विषय झाला आहे, त्यामध्ये ज्या डीपी plan चे इमप्लिमेन्टेशन केले असेल तर, तो डीपी plan काय होता? याचे अधिकार कोणाला होते? आणि टाऊन प्लॅनिंगचा याच्यामध्ये काय रोल होता? याची माहिती सभागृहात देण्यात यावी.

मा.महापौर :स.सदस्य या ठिकाणी सभागृहात निवेदन करत असतांना, ज्या सुचना किंवा जे प्रश्न उपस्थित करत आहेत. अधिकाऱ्यांनी याची नोद घ्यायची आहे. सगळ्या प्रश्नांचे एकत्रित उत्तर देण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :डीपी plan मध्ये बदल करण्याचा अधिकार मनपाला नाही. याच्यासाठी राज्यशासनाची परवानगी घ्यावी लागते. ही मनमानी कोणाच्या सांगण्यावरुन करण्यात आली? याच्यावर सर्वात आधी अभ्यास करणे, याच्यावर कार्यवाही करणे, हे खुप जास्त गरजेचे आहे. मागच्या सहा महिन्यापासुन श्री.सिध्दांत शिरसाट रेल्वे स्टेशनचा रस्ता मोकळा करण्यासाठी सभागृहा समोर विषय मांडत आहेत. मग दमडी महलच्या बाबतीत कोणाच्या तरी सांगण्यावरुन अधिकारी जातात, तेथील अतिक्रमण अतिशय निष्ठापुर्वक पार पाडतात, आणि तेथे एका प्रकारे फटाके फोडुन जल्लोष साजरा होतो हे योग्य नाही. एक अतिक्रमण काढत असतांना, तेथील घर निष्काषीत करत असतांना, दुसऱ्याच दिवशी तेथे पत्र्याचा शेड ठोकला गेला. या शहरामध्ये अशा अनेक इमारती आहेत, ज्यांना बांधकाम परवानगी नाही. त्या त्या भागातील नगरसेवक या

गोष्टीचा पाठ पुरवठा करत आहेत की, ह्या काढल्या पाहिजेत. पण ते अजुनही होत नाही. कुठल्याही जातीय राजकारण व अतिक्रमणाला सर्पोट करायला आम्ही नाही आहोत. आम्ही या शहराच्या विकासासाठीच कटीबध्द आहोत. जे-जे अतिक्रमण काढायचे आहेत त्याच्यात कुठल्याही जातीचे राजकारण असायला नको. सगळ्या भागातील हात गाड्या हटवण्याची मागणी पुर्ण होत नाही, आणि हे अतिक्रमण पाडायला यांना कसा वेळ भेटतो? याच्यामध्ये डीपी plan चा विषय असेल, कोणाच्या आदेशाने ते अतिक्रमण काढले हा विषय असेल, हा रस्ता वळवला कसा असेल, ह्या सगळ्या गोष्टींची सखोल चौकशी होणे अपेक्षित आहे. याच्यामध्ये पदाधिकारी, नगरसेवक दोषी असेल, कोणीही असेल त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे.

श्री.राजु शिंदे :मा.महापौरांनी सांगीतल्यानंतर किती वेळेस अधिकाऱ्यांनी ते काम केले व किती वेळेस जाऊन अतिक्रमण तोडले आहे? श्री.बारवाल साहेबांनी ते अतिक्रमण अधिकाऱ्यांना जाऊन काढायचे सांगितले होते, कोणत्याही नगरसेवकाला नाही. त्या भागामध्ये एकच हिंदु धर्माच्या व्यक्तीच घर होते. म्हणुन काही जातीवादी पक्षाच्या लोकांनी ते घर पाडण्यासाठी प्रयत्न केला आहे. तेथे अधिकाऱ्यांवर दमदाटी केली आहे आणि गैर वर्तणूक पण करण्यात आली आहे. आता जे projector वर video shooting दाखवणार आहे, ते पहावे परंतु महानगरपालिकेची नियमावली बनवलेली आहे. या नियमाप्रमाणे मनपाचे कामकाज चालत असेल तर त्या नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. प्रकरण दहाचे प्रकरण १-ड हे सभागृहासमोर वाचुन दाखववे. त्यानुसार कारवाई होण्याची अवश्यकता आहे.

नगर सचिव :प्रकरण दहा मधील १-ड मी वाचुन दाखवत आहे.

प्रकरण १-ड नुसार जर पालिका सदस्याने, स्वतः त्याच्या बायकोने/तिच्या नवऱ्याने किंवा त्याच्या अवलंबिताने या अधिनियमाच्या किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा.३७) याच्या किंवा उक्त अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांच्या किंवा उपविधींच्या तरतुदींचा भंग करुन, कोणतेही बेकायदेशीर किंवा अनानिकृत संरचनात्मक बांधकाम केले असेल किंवा करीत असेल; किंवा असे बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम करण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असेल किंवा पालिका सदस्य या नात्याने मदत केलेली असेल किंवा कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम पाडून टाकत असताना त्याचे शासकीय कर्तव्य पार पाडण्यात कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्यास लेखी पत्र देऊन किंवा प्रत्यक्ष जागेवर जाऊन अडथळा आणला असेल किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न केला असेल तर, असा पालिका सदस्य, म्हणुन राहण्यास अनर्ह ठरेल. अशी अनर्हता, उक्त अधिनियमाच्या तरतुदी अन्वये, संबंधित प्राधिकाऱ्याने, अशी संरचना बेकायदेशीर, किंवा अनधिकृत असल्याचे घोषित केल्याच्या दिनांकापासून किंवा यथास्थिति, सक्षम प्राधिकाऱ्याविरुध्द पालिका सदस्याने हस्तक्षेप किंवा अडथळा

केल्याच्या दिनांकापासुन पालिका सदस्य म्हणून त्याचा पदावधी शिल्लक असेपर्यंत असेल.

श्री.राजु शिंदे :याच्यात दिल्याप्रमाणे जर एखादा पालिका सदस्य तिथे असेल किंवा दबाव टाकण्याचा प्रयत्न करत असेल अशा पालिका सदस्याला त्याच्या कर्तव्यापासुन दुर करता येते. तेथे नगरसेवकाची प्रत्यक्ष हजर राहण्याची काय अवश्यकता होती? दबाव टाकण्याची काय गरज होती? प्रत्यक्ष अधिकारी जबाबदारी पार पाडत असेल, तर त्या नगरसेवकाला तेथे जाण्याची गरज काय? याचा अर्थ असा की, त्या प्रशासकीय कामामध्ये त्यांनी अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. त्याच्यावर ३५३ दाखल झाला पाहीजे आणि प्रकरण १०(१-ड) प्रमाणे कारवाई झाला पाहिजे. शासनाला कळविले पाहिजे की, ह्या नगरसेवकानी संबंधीत ठिकाणी उभे राहून अडथळा आणि दबाव आणला.

श्री.गंगाधर ढगे :चंपाचौक ते जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी रस्ता रुंदी करणाचे काम सुरु आहे. चंपाचौक ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान दमडी महल ही निजामकालिन वास्तु आहे. त्याठिकाणी इतिहास प्रेमीयांचा विरोध असतांना सुध्दा महानगरपालिकेने दमडी महल पाडण्यात आले. श्री.पवार यांचे घर पाडण्याच्या अगोदर त्याठिकाणी सात मुस्लिम समाजाची घरे पाडण्यात आली. तेथे एम आय एमचा एकही नगरसेवक गेला नाही आणि विरोध पण केला नाही. तसेच श्री.पवार यांचे घर सुध्दा रस्ता रुंदीकरणात बाधित होत होते. आणि शहर विकास आराखड्यानुसार कार्यवाही करणे गरजेचे होते.

(यावेळी अनेक सं.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

मा.महापौर :कोणाचेही मन दुखावेल असे बोलु नका. एक-एक सदस्य सभागृहात बोलतील.

श्री.गंगाधर ढगे :याठिकाणी कुठल्याही जातीचा विषय नाही. हा शहराचा विकासाचा विषय आहे. श्री.पवार यांच्याकडे त्या जागेचे कागदपत्र सुध्दा नव्हते. यामध्ये महापालिकेने कार्यवाही केली तर, हिंदुचा प्रश्न येतो कोठे?

श्री.राजेंद्र जंजाळ :या विषयाबाबत जास्त चर्चा न करता जी video clipping केलेली आहे, ती दाखवण्यात यावी.

श्री.प्रमोद राठोड :दमडी महल येथील अतिक्रमण काढले गेले. त्या संदर्भात गेल्या काही दिवसापासून हा विषय चर्चेला होता. डीपी रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याकरिता किंवा कुठलेही अतिक्रमण काढण्याकरिता नगरसेवकांचा विरोध नव्हता. ते अतिक्रमण काढत असतांना जी दहशत निर्माण करुन video film बनवुन व्हायरल केली गेली की, आम्ही कशा प्रकारे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर दादागिरी करतो, कशा शिव्या देतो? कशा प्रकारे त्या घराचा हातोड्याने दरवाजा तोडायला लावता? कुठलीही अतिक्रमणाची कार्यवाही होत असतांना प्रशासनाच्या वतीने गुलमंडीचे अतिक्रमण असेल, जयभवानी नगरमधील अतिक्रमण असेल, असे मोठी-मोठी अतिक्रमणे रस्ता रुंदीकरणामध्ये येतात. त्यावेळेस असा कुठलाही विषय झाला नाही. जेव्हा प्रशासन कार्यवाही

करायले गेले होते, तेव्हा श्री.खान फेरोज मोईनुद्दीन त्या ठिकाणी दादागिरी करतात, त्यांच्याशी वाईट भाषेत बोलतात. त्यांना काय गरज होती? त्याठिकाणी जाण्याची. याच्या आधी सुध्दा त्यांनी सन-२०१७ मध्ये पाणी पुरवठा अधिकारी श्री.चहल यांना शिवीगाळ केली होती. त्यासंदर्भात सिटी चौक पोलिस स्टेशनमध्ये त्यांच्यावर ३५३,३२३,५०४,५०६ नुसार गुन्हा सुध्दा नोंद झाला आहे. गुन्हा नोंद झाल्यानंतर नगरसेवक पद रद्द करण्यासाठी तत्कालिन आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया यांनी राज्य शासनाला पत्र सुध्दा दिलेले आहे. ह्या सगळ्यामध्ये श्री.खान फेरोज मोईनुद्दीन यांनी दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, हा फक्त दादागिरीचाच विषय आहे. जे अतिक्रमणाचे अधिकारी होते, श्री.अभंग आणि श्री.काझी यांनी ते अतिक्रमण होत असतांना जे काही video-shoot आली आहे, यासंदर्भात मा.आयुक्तांना रिर्पोट केला आहे का? की, आमच्यावर अशा प्रकाराची नगरसेवकाने दादागिरी केली, ते तोडण्यासाठी दबाव टाकला, याबाबतीत पुर्ण माहिती मा.आयुक्तांना देण्याचे त्यांचे काम होते. हा संपुर्ण विषय प्रशासनाचा आहे. प्रशासनाचे प्रमुख म्हणुन मा.आयुक्त यांनी याचा खुलासा करावा. त्यांचे नगरसेवक पद रद्द करण्यासाठी त्यांनी राज्य शासनाला कळवावे. Video clip लावण्यात यावी, त्याच्यावरुन सगळे काही स्पष्ट होईल.

श्रीमती सरवत बेगम :दमडी महल ब्रिजचे आणि दमडी महल रस्त्याचे काम दोन वर्षापासुन चालू आहे. ह्या रस्त्याच्या कामासाठी काही जागा घेतलेली आहे. त्यामध्ये सिटी सर्वे नं.५६ ची जागा घेतली, त्याच्यासोबत सिटीएस नं.११३२९,११३२८ आणि सलिमबीन आवत यांची जागा ४००० स्केअर फिट घेतली, कृषी विभागाची २२००० ते २५००० स्क्वेअर फिट जागा घेतली, श्री.साजेद खान यांची १६००० स्क्वेअर फिट जागा घेतली, हुसेन जिवानी यांची २००० ते २५०० स्क्वेअर फिट जागा घेण्यात आली आहे. याच्यासोबत कप्तान कलरचे मालक आणि त्यांच्या बाजुवाल्यांची ८००० स्क्वेअर फिट जागा घेण्यात आली आहे. ह्या सात लोकांची मालकी हक्काची जमीन घेण्यात आली आहे. त्या जागेचा त्यांना मोबदला देण्यात आलेला नाही. पण श्रीराम पवार यांच घर सरकारच्या जागेवर आहे. १९७२ च्या डीपी प्लॅन मधील ही जागा येतो. टाऊन प्लॅनिंगच्या कर्मचाऱ्यांनी मोजुन, मार्किंग करुन ती जागा काढण्यासाठी सुचना श्रीराम पवार यांना दिली आहे. आणि श्रीराम पवार यांनी नाहरकत प्रमाणपत्रावर सही सुध्दा केली होती की, ही जागा काढण्यासाठी माझी काही हरकत नाही. परंतु या प्रकरणात राजकारण आले. अतिक्रमण विभाग आणि टाऊन प्लॅनिंग विभागाने पुर्ण लिगल काम करुन श्रीराम पवार यांच्या घराला पुर्ण पोलिस बंदोबस्तात तोडण्यात आले. वृत्तपत्राच्या माध्यमातुन माहित झाले आहे की, श्रीराम पवार यांना १५०० स्क्वेअर फिट जागा पुनर्वसन करण्यासाठी देण्यात येणार आहे. श्रीराम पवार यांच्याकडे त्या जागेचे कागदपत्र सुध्दा नाही. याच रस्त्यातील बाधीत सात लोकांचे अतिक्रमण काढण्यात आले आहे, त्यांना पण पर्यायी जागा देण्यात यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:जे अतिक्रमण काढण्यात आले आहे. ते योग्य पध्दतीने काढण्यात आले नाही. ते अतिक्रमण प्रशासनाऐवजी स.नगरसेवकच काढत आहेत, असे तिथे भास होत होता. आणि त्याची video clip बनवून सोशल मिडीयावर व्हायरल करण्यात आली. त्यामुळे शहरातले वातावरण खराब होण्याची शक्यता निर्माण झाली असती. माझ्या वार्डातील अतिक्रमणाच्या बाबतीत मी अनेक पत्र दिले त्यानुसार काय कार्यवाही केली? त्याची पण माहिती देण्यात यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :सन-२०११ मध्ये तत्कालिन आयुक्त यांनी बारा रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम हाती घेण्याची मोहीम राबवली होती. आज त्या रस्त्यावर कोणाचे अतिक्रमण झाले आहे, त्या अतिक्रमणाच्या बाबतीत संबंधीत अधिकारी यांनी काहीच काम केलेले नाही. अजुनही तेथे तितक्याच हातगाड्या उभ्या असतात. प्रशासनाने त्याचा सुध्दा खुलासा करण्यात यावा. दमडी महल येथील अतिक्रमण पाडण्याच्या बाबतीत महसुलची परवानगी घेतली होती का? याचा पण खुलासा झाला पाहिजे.

मा.महापौर :संबंधित कर्मचारी यांनी projector वर video shooting दाखवण्यात यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :श्रीराम पवारचे घर पाडण्यात आले, जर ही संचिका नगररचना विभागाकडे गेली असेल तर त्यांनी काय अभ्यास करून बघून त्या बाबत अतिक्रमण विभागास त्या रस्त्यावरील अतिक्रमण काढणेचे आदेशीत केले होते. शहरात इतर अतिक्रमणाच्या बाबतीत अनेक प्रश्न आहे. नगररचना विभागाचे अधिकारी तेथे कशासाठी गेले होते? त्यांनी डीपी प्लॅन मध्ये बदल केलेला आहे का? त्यांचेकडे अतिक्रमणचा नी नगररचना विभागाचा चार्ज होता? सर्व माहिती द्यावी.

श्री.नासेर सिद्दीकी :या शहराचा विकास व्हावा हे शहर आपले आहे. असे मानणारे लोक या शहरात आहे. शहराच्या विकासासाठी जात धर्म नसतो, एखादा रस्ता होतो तर ठराविक जाती धर्माच्या लोकांनाच तेथून जाता येते का नाही? विद्युत खांब उभा केला तर तेथे एका विशिष्ट जाती धर्माच्या व्यक्तीसाठीच प्रकाश मिळतो का? नाही, शहराचा विकास हा सर्वाचाच विकास होतो, सर्व पक्षाचे सदस्य येथे आहेत. परंतु सर्वांची ओळख हीच की, या शहराचा विकास झाला पाहिजे. शहराचा विकास थांबलेला होता. आपण निवडून आलो, एक विचार केला की, विकास सर्व मिळून करायचा. त्याचाच एक भाग हा दमडी महल रस्ता आहे. कुणाचीही दुकाने, घरे तोडली जाऊ नये. अशी आपणा सर्वांचीच भावना आहे. दमडी महल येथील अतिक्रमण काढले. त्या संदर्भात विविध प्रश्न विचारले जात आहे. आताच म्हटले की, अतिक्रमण काढल्यानंतर फटाके फोडले गेले. कुणीही फटाके फोडले नाही. तसे झाले असेल तर, आम्ही २५ सदस्य राजीनामा देऊ. आम्ही हेच जाणतो की, विकासाचे काम व्हावे, आम्ही आपल्या बरोबर आहे बरोबर राहू, आपण पुर्वीच निर्णय घेतलेला आहे की, विकास कामासाठी? कुणाची जात धर्म पाहिला जाणार नाही. दमडी महल येथील एक घर काढले. आणखी पुढे घरे पाडली जाणार आहेत. ते घर कोणत्या जाती, धर्माचे व्यक्तीचे आहे? हे पाहिले जाणार नाही. कारण शहराचा विकास करायचा असेल तर हे

करावेच लागेल. जे विकास कामामध्ये, रस्त्यात येतील त्याचे घरे तोडली गेली पाहिजे अशी आमची मागणी आहे.

श्री.राजू शिंदे :अतिक्रमण काढावे किंवा पाडावे यास कुणाचाही विरोध नाही. जाती धर्माचा विषय नाही. परंतु काही स.सदस्य त्या ठिकाणी जाऊन अतिक्रमण पाडण्यासाठी प्रयत्न करतात. तेथील नागरीकांना भयभीत करीत होते. असे करता येते का? सगळ्यांनाच वाटते की, शहराचा विकास झाला पाहिजे.

श्री.अय्युब जागीरदार :दमडी महलचा रस्ता १९७२ साली डीपी प्लॅन केला. हा रस्ता जिल्हाधिकारी कार्यालय ते आकाशवाणी पर्यंत जाणार आहे. तसेच या रस्त्या लगत गेस्ट हॉऊस, पंचायत समिती, कमिशनर ऑफिस, जिल्हाधिकारी कार्यालय येतात. त्यामूळेही हा रस्ता होणे आवश्यक आहे. वांरवार असे सांगण्यात येते की, श्री.फेरोज खान यांनी अतिक्रमण काढते वेळी शिवीगाळ केली. परंतु व्हिडीओ क्लीप दाखवली. त्यात कुठेही तसे बोललेले दिसून येत नाही. उलट त्यांनी अधिकारी यांना असे म्हटले की, कायदेशीर कार्यवाही करावी. हे तोडण्यासाठी आयुक्तांचे आदेश आहेत. जर काही बाधा आली तर पोलीस विभागास तक्रार करा पोलीस सहाय्यता घ्यावी. यापुर्वी श्रीराम पवार यांचे घर हटविण्यासाठी पथक गेले. तेथे दगडफेक झाली होती. पोलीस संरक्षण घ्यावे लागले. त्या दृष्टीकोनातून आता श्री.फिरोज खान हेही मदत करणेसाठीच गेलेले होते. जे की, तेथे भांडण किंवा इतर वाद होऊ नये. वातावरण खराब होऊ नये यासाठी गेले होते. सात मुस्लीम लोकांची घरे तोडली. त्यावेळी श्री.फेरोज खान तेथे गेलेले नव्हते. आत्ताच नियम वाचला की, बाधा आणणाऱ्यांवर कार्यवाही व्हावी. श्री.फेरोज खान यांनी कोणतीही बाधा तेथे आणलेली नाही. उलट ते कायदेशीर कार्यवाही करावी. असे सांगतात. परंतु बाधा तर संबंधीत व्यक्ती श्री पवार त्यांचे कुटूंबाचे सदस्य आणत होते. त्यांचेवर ही कार्यवाही करावी. ते काढण्याचे मा.आयुक्तांचेच आदेश होते. श्री.फेरोज खान यांचे आदेशानुसार श्री.अभंग तेथे कार्यवाहीस गेलेले नव्हते. श्रीराम पवार वारंवार महापौर, सभापतीना फोन करीत होते. आपल्या नावाचा सहारा घेत होते. हे योग्य आहे का? श्री.फेरोज खान यांचेवरील आरोप सिध्द होत नाही. मा.आयुक्ताचेच आदेश होते की, हे अतिक्रमण काढावे.

मा.महापौर :फोनवर कुणी व्यक्ती माझे नाव घेऊन बोलत असेल तर हे वैयक्तिक होऊ शकते.

श्रीमती सरवत बेगम :जी कार्यवाही केली ती कायदेशीर व नियमानुसार केली आहे. श्री.पवार यांचे अतिक्रमण काढले. प्रोजेक्टरवर चर्चा केली. यानंतरही असेच प्रोजेक्टर दाखवुन चर्चा करून कार्यवाही होणार आहेत का? श्रीराम पवार स्वत: जेवढे रस्त्यात घर बाधीत होते तेवढे अतिक्रमण काढण्यास तयार होते. ज्यांना जागा नाही, उत्पन्न काहीच नाही, गरीब लोक आहेत अशांचे अतिक्रमण काढले तर पर्यायी जागा देणे योग्य आहे. परंतु श्रीराम पवार हे इन्कम टॅक्स भरतात. त्यांना पुनर्वसन साठी जागा देण्याची गरज नाही.

मा.महापौर :श्रीराम पवार यांचे ते घर होते. म्हणून चर्चा होत नाही. ज्या पध्दतीने ते घर तोडले, कार्यवाही केली त्या बाबत चर्चा चालू आहे.

श्रीमती सरवत बेगम :अनेक वेळा त्यांना नोटीस दिली, आणखी कशा पध्दतीने कार्यवाही करायला पाहिजे होती?

श्री.नासेर सिद्दीकी :आम्ही ही एक क्लीप आणतो. ती दाखविण्याची परवानगी द्यावी.

मा.महापौर :आपण अर्ज दु.१.१० वा. दिला व दु.४.०० वाजता सांगतात की, क्लीप दाखवा यावर लिगल अभिप्राय घेऊन पुढील सभेत दाखविण्याबाबत योग्य निर्णय घेतला जाईल.

श्री.प्रमोद राठोड :स.श्री.सिध्दांत शिरसाट यांचेकडेही एक क्लीप आहे. ती दाखविण्याची परवानगी द्यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :स.सदस्य श्री.सिध्दांत शिरसाट यांनी रेल्वेस्टेशन येथील जागेबाबत कार्यवाही करणेसाठी सांगितले होते त्यावेळी हे सदस्य का गेले नव्हते? दमडी महल येथील अतिक्रमण काढतांना जे-जे स.सदस्य तेथे गेले होते. त्यांचे नातेवाईक होते. त्या सर्वांवर कार्यवाही करावी. तसेच श्री.जफर कादरी ही व्यक्तीही तेथे होती. ते अधिकारी यांना शिवीगाळ करीत होते. त्यांचेवरही कार्यवाही करावी. श्री.फेरोज खान हे स्वतः अधिकाऱ्यांना जातीवाद करतात असे बोलत होते.

मा.महापौर :नगररचना विभागाचे अधिकारी नाही. श्री.खरवडकर यांनी खुलासा करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :श्री.खरवडकर यांची पोस्टींग कुठे आहे? त्यांचेकडे अतिक्रमणाचा चार्ज आहे. ते सहा.संचालक नगररचना नाही. त्यांची अतिक्रमण विभागात बदली झाली होती. तेथे ते रूजू का झाले नाही?

मा.महापौर :सहा.संचालक नगररचना येथे नाही ज्येष्ठ अधिकारी नसेल तर त्यांचे ज्युनिअर यांनी खुलासा करायचा असतो. ही एक व्यवस्था असते.

श्री.राजेंद्र जंजाळ :श्री.खरवडकर ही सदर ठिकाणी होते. ते अतिक्रमणाचे प्रमुख म्हणून की, सहा.संचालक नगररचना विभागाचे अधिकारी म्हणून गेले होते. देवघरा पर्यत अधिकारी बुट घालून गेले. हा हिंदु धर्माचा अपमान केलेला आहे. हे योग्य नाही. त्यांची नियुक्ती सध्या कोणत्या पदावर आहे? कोणत्या विभागात आहे? सर्व माहिती द्यावी.

उपआयुक्त (महसूल) :श्री.जयंत खरवडकर यांना १३ एप्रिल २०१७ रोजी मुळ पदस्थापना अतिक्रमण विभागात दिली होती व नगररचना विभागात सहा.नगररचनाकार म्हणून अतिरिक्त कार्यभार दिलेला होता. परंतु ते नगररचना विभागातच तेंव्हा पासून काम करीत आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :बदली होऊन सुध्दा नगररचना विभागात काम का करीत आहे? स्पेशल सुट दिली का? त्यांचा पगार कोणत्या पदाचा निघतो? ते सांगावे.

उपआयुक्त (महसूल) :लेखा विभागाकडून पगार काढला जातो. लेखाविभाग माहिती देऊ शकेल.

श्री.राजेंद्र जंजाळ :श्री.खरवडकर यांना नगररचना विभागात राहण्यासाठी काही सदस्यांनी स्वतः प्रतिष्ठा पणाला लावली. त्याची परतफेड म्हणून श्री.खरवडकर यांनी या रस्त्याच्या डीपी प्लॅन मध्ये बदल करून ऑर्डर करून दिली आहे. त्या संचिकेवर यांनी काय म्हणून सही केली होती? या प्रकरणात भावनेचा प्रश्न

आहे. हेच एखाद्या मुस्लीम व्यक्तीचे घर असते व महिला घरात असतांना घर तोडले असते तर त्याचे शहरात काय इफेक्ट झाले असते?

श्री.फेरोज खान :याच रस्त्यात बाधीत होणारी सात मुस्लीमांची घरे तोडली आहेत.

श्री.नासेर सिद्दीकी

(यावेळी अनेक स.सदस्य बोलत होते.)

श्री.राजगौरव वानखेडे :सात घरे पाडली असेल परंतु दरवाजा तोडून मध्ये गेलेले नव्हते. श्री.खरवडकर यांची मुळ पदस्थापना नगररचना मध्ये नाही. इतर अधिकारी यांचे कडून खुलासा घ्यावा.

श्री.राजेंद्र जंजाळ :अशा प्रकारची कार्यवाही करीत असतांना पंचनामा करावा लागतो का? त्यानंतर किती दिवसानंतर अशा प्रकारची कार्यवाही करावी लागते? महिला घरात असतांना घर पाडले. एवढी काय गरज भासली की, तेथे वाहतूक बंद झाली होती, तेथे आग लागली होती. आणी-बाणीची परीस्थिती निर्माण झाली होती. ते घर पाडणे. त्याच वेळी आवश्यक होते का? श्री.खरवडकर यांनी एका प्रकरणात पॅनल वर ते वकील नसतांना मा.कोर्टासमोर उभे केले होते.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:तीन पायऱ्या मध्ये आल्यामूळे भुमिगतचे काम सहा महिने थांबले होते. येथे महिला घरात असतांना एवढी काय तातडीचे होते की ते घर पाडले.

मा.महापौर :श्री.खरवडकर अतिक्रमण काढण्याच्या ठिकाणी गेले त्यावेळी ते कोणत्या पदावर होते? सध्या कोणत्या पदावर कार्यरत आहे? सर्व कागदपत्र तपासून मा.आयुक्त यांनी महापौरांकडे अहवाल द्यावा.

श्री.राजगौरव वानखेडे :श्री.खरवडकर यांची बदली अतिक्रमण विभागात झालेली असताना ते रूजू झाले नाही. मा.सभापती यांनी तेथे रूजू होण्याचे आदेशीत केले होते. तरी सुध्दा ते रूजू का झाले नव्हते? एका ठिकाणी सभापतीचे आदेश पाळले जाते. दुसरीकडे का नाही?

मा.महापौर :आता कुणाकडून खुलासा अपेक्षीत आहे?

श्री.राजेंद्र जंजाळ :श्री.खरवडकर कडून खुलासाच नको. जे की, मुळात खोटे बोलून पदावर बसलेले आहेत. श्रीराम पवार यांचे घर ज्या पध्दतीने पाडले तसे कुणाचेही घर पाडले असेल तर तसे सभागृहाला दाखवावे.

श्री.प्रमोद राठोड :श्रीराम पवार यांचे घर ज्या पध्दतीने पाडण्यात आले. यापुर्वी अशा प्रकारची कार्यवाही कुठे केलेली होती का? श्री.अंभग यांचेकडून माहिती घ्यावी.

श्री.अय्युब जागीरदार :ज्यांची ७ घरे त्याच रस्त्यातील पाडली त्यांची ती मालकी हक्कातील जागा होती.तरी काढली गेली.

श्री.राजेंद्र जंजाळ :श्रीराम पवार राहत होते ती महसूल विभागाची जागा होती. ते घर पाडण्यासाठी महसुलची परवानगी मनपाने घेतली नाही. असे असतांना ते घर पाडले. हे योग्य नाही.

श्री.विकास जैन :एक तास क्लिप बघितली आहे. श्रीराम पवार यांचे घर पाडण्याच्या सुचना प्रशासनाने दिल्या. ज्या पध्दतीने कार्यवाही होणे अपेक्षीत होते. तशी झाली नाही. या बाबतीचा निषेध केला पाहिजे. ज्या पध्दतीने घर पाडले तसा प्रंसग शहरातील कोणत्याही वार्डातील कोणत्याही समाजाच्या व्यक्तीचे घर पाडतांना

झाला नसेल. तशी अपेक्षा कोणीही करणार नाही? २५ वर्षापासून आम्ही सदस्य आहोत. परंतु अनेकदा अतिक्रमण काढले तेथे आम्ही गेलो नाही. नेहमीच प्रशासनाला सहकार्य केलेले आहे. ते अतिक्रमण कोणाचे होते? कोणत्या समाजाच्या व्यक्तीचे होते? तो विषय येथे येत नाही. शहरातील धार्मीक स्थळे तोडली. परंतु कोणीही विरोध केला नाही. सदस्य तेथे गेले नाही. या प्रकरणात ज्यांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर कार्यवाहीचा बाबत योग्य निर्णय घ्यावा.

उपअभियंता(न.र) :गुलशन महल ते जालना रेड १०० फुटाचा रोड व गुलशन महल ते सेव्हनहिल पर्यंत जाणारा ८० फुटाचा रोड यामध्ये जंक्शन आयलॅण्ड आहे त्यांचे बाजूला न.भु क्रमांक १८४१४ आहे. त्याची मार्कींग विकास योजनेनुसार दिली होती. जे स्ट्रक्चर आहे ते रस्त्यात बाधीत आहे म्हणून मार्कींग होती. ते मार्कींग करणे नगररचना विभागाचे काम आहे ती मार्कींग दाखविण्याच्या अनुषंगाने श्री.खरवडकर तेथे गेले होते.

श्री.राजेंद्र जंजाळ :यापूर्वी तेथे रस्त्याची मार्कींग व अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही झाली होती का? जेंव्हा डीपी रस्त्यातील जागा ताब्यात घेतो, तेंव्हा टी.पी. विभागाची कार्यवाही काय असते? ती जागा कुणाच्या मालकीची होती. रस्ता बाधीत जागेचे अधिग्रहण करतो तेंव्हा जागा मालकाला पत्र देतो. तसे पत्र महसूलला दिले होते का? किंवा जागा ताब्यात घेणे बाबत महसूलने पत्र मनपास दिले होते का?

उपअभियंता(न.र.) :डीपी रोडची मार्कींग नगर रचना विभागाकडून दिली आहे. हे घर रस्त्यात बाधीत आहे व ही शासकीय जागा आहे. असे या संचिकेत उल्लेख आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :या रस्त्यावरील कृषी विभागाची जागा ताब्यात घेतली. त्या विभागास पत्र दिले असेल तेंव्हा ती जागा मिळाली असेल. श्रीराम पवार राहत होते ती जागा कुणाची होती?

उपअभियंता(न.र.) :पीआर कार्ड नुसार ही महाराष्ट्र शासनाची जागा होती.

श्री.राजेंद्र जंजाळ :जर शासनाची जागा होती तर नगररचना विभागाने तसे शासनास पत्र दिले होते का? शहरात अनेक मनपाच्या जागेवर अतिक्रमण झाले ते काढले जात नाही आणि श्री.पवार राहत होते ती जागा महसूलची असतांना मनपाने तेथील अतिक्रमण काढले. हे योग्य नाही. शहरातील जनता अपेक्षेने बघते. एखादा गरीब व्यक्ती घर बांधतो तेंव्हा मेहनतीचा पैसा पुर्ण तेथे खर्च करतो. ६५ वर्षाची महिला हात जोडते की वेळ द्यावा. तरीही प्रशासनाला दया आली नाही. रेल्वेस्टेशन भागात अतिक्रमण काढणेस गेले तेथे नागरीकांचा जमाव झाला. तर आपले अधिकारी तेथून पळून आले. समर्थनगर मध्ये एका वृध्दाश्रमांच्या जागेवर एका व्यक्तीने अतिक्रमण केले. मी दीड वर्षापासून पत्र देतो. कार्यवाही होत नाही जर जात,पंथ पाहून कार्यवाही होत असेल तर प्रशासनाने तसे सांगून टाकावे. यापूढे शिवसेनेचा एकही सदस्य अतिक्रमाच्या बाबतीत बोलणार नाही. यापुर्वी आंबेडकरनगर, घाटी झोपडपट्टीत कार्यवाही केली. मंदीर पाडले तेंव्हा असा आक्रोश झाला नाही. तरी सुध्दा तेथे कुणी गेले नाही आणि श्रीराम पवार

सारख्या व्यक्तीचे घर पाडताना कायद्याची व नियमाची पायमल्ली होत असेल तर योग्य नाही. महसूलने जागा ताब्यात घेण्यासाठी मनपास पत्र दिले होते का? यांचे उत्तर प्रशासनाकडे नाही.

उपअभियंता(न.र) :संचिका बघून सांगता येईल.

श्रीमती माधुरी देशमुख :महसूलचे पत्र प्रशासनाकडे आले नाही तर इलिगल कार्यवाही मनपा करू शकते का?

मा.महापौर :शासनाच्या जमिनीवरील अतिक्रमण बांधकाम असेल ते काढायचे असेल तर ती जागा ताब्यात घ्यायची असेल तर परस्पर ती जागा ताब्यात घेऊ शकतो का? पध्दत काय आहे?

उपअभियंता-(न.र.) :दोन प्रकार असतात ही जागा महापालिकेच्या डीपी रोडमध्ये बाधीत आहे जर त्यांचा काही प्रोजेक्ट करायचा असेल तर ते मनपाकडे मागणी करतात.

श्री.राजेंद्र जंजाळ :चुकीची माहिती देत आहे. मनपाची गरज होती तर कुणाच्या जागेवर जाऊन विना परवानगी ते पाडणार का? ज्याची जागा आहे त्यांना विचारणार नाही का? अशा प्रकारची उत्तरे आम्हाला अपेक्षीत नाही.

श्री.विकास जैन :आरटीओ ऑफिसची भिंत मनपाच्या डीपी रस्त्यात बाधीत आहे. शासनाची आहे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ती मनपास हस्तांतरीत झाली नाही म्हणून तोडू शकलो नाही. ही पण महसुलची जागा होती. तर ताब्यात न घेता घर कसे तोडले.

श्री.राजेंद्र जंजाळ :आरटीओ ऑफिसची भिंत एनओसी मिळत नसल्याने तोडू शकलो नाही. श्रीराम पवारचे घर काढले त्या बाबत महसूलची एनओसी घेतली नाही. जी कार्यवाही केली याचा अर्थ त्यात कुणावर अन्याय व्हावा व कुणाचा तरी फायदा होणार होता म्हणून पुर्वग्रह दुषीत असलेली कार्यवाही मनपाने केली. कुणालाही न्याय मिळण्याच्या दृष्टीने जनतेने आपल्याला निवडून दिले आहे. श्रीराम पवारची ती जागा नव्हती, इलिगल होते व ती जागा महसूलची असतांना महापालिकेला कार्यवाही करण्याची गरज का पडली? शहरातील बाकीचे डीपी रोडवरील अतिक्रमण का काढले जात नाही? ६५ वर्षाची वयोवृध्द महिला हात जोडून विनंती करते, तरीही आपले अधिकारी यांनी ऐकले नाही. नगररचना विभागाने केलेली कार्यवाही बरोबर होती, नियमाने आहे, चूक आहे, गैरवाजवी आहे याचा निर्णय आपल्याला घ्यायचा आहे.

मा.महापौर :शासकीय जमिनीवरील कार्यवाही करतांना काय पध्दत असते? त्याची माहिती द्यावी.

श्री.सिध्दांत शिरसाट :दमडी महलचे जे अतिक्रमण पाडले. ती जागा शासकीय होती. ठिक आहे. परंतु मी रेल्वेस्टेशन येथील पेट्रोल पंप हटवा अशी मागणी एक वर्षापासून करतो. त्या जागेचे मनपाकडे कागद नाही. मी सर्व कागदपत्रे दिले मी त्या विषयी अंदोलन केले व त्यावेळी काही अधिकारी तेथे तोडण्यासाठी गेले. व मनपाच्या जागेवर पथक जाते. सन-१९९८ ला ती जागा मनपाने विकत घेतली. परंतु मनपाच्या नावे नाही. सन-२०१४ मा.कोर्टाने आदेश केले की, ही जागा मनपाने ताब्यात घेऊन तेथील अतिक्रमण काढावे. तेथे पथक जाते अतिक्रमण

काढत नाही. परंतु तोडत नाही. हॉटेलमध्ये जाऊन बसतात. कार्यवाही करीत नाही. पोलीसांनी मदत केली नाही. असे पथक सांगते. स्टे आलेला आहे असे सांगतात. अधिकारी समोरच्या व्यक्तीला कोर्टात जाण्याचे सांगतात. मनपाची जागा आहे. अतिक्रमण काढले जात नाही. आरटीओची भिंत आहे. ती मनपाची जागा आहे. काढली जात नाही. तसेच मनपाची एक इमारत पाडण्यात आली. मी पत्र दिले. निष्काषीत केली जात नाही. पोलीस स्टेशनसाठी इमारत द्यायची होती. देऊ दिली नाही. बीडबाय पास रस्त्यावर अपघात होतात. अतिक्रमण काढले जात नाही. जनता हॉटेल मालकास कोर्टात जाण्यासाठी वेळ दिला जातो, तर श्री.पवार यांचे घर पाडतेवेळी दोन तासाचा वेळ दिला नाही. हे योग्य नाही. काहीचे जाणूनबजून ठेवायचे काहीचे अतिक्रमण काढायचे असा प्रकार होत आहे. संबंधीतांवर योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल मं नाविद :रेल्वेस्टेशन येथील प्रकरण मा.न्यायालयाचे जैसे थे चे आदेश आहे. असे असतांना चर्चा करता येते का? सन-२०१४ कोणता निर्णय आलेला आहे? कोणती जागा भुसंपादन केली?

श्री.अफसर खान :महापालिकेने वर्क्फ बोर्ड कडुन २८० स्क्वे.फुट जागा भुसंपादीत केली होती. ती जागा ताब्यात घेतली. उर्वरीत तेवढीच जागा आहे. वर्क्फ बोडची आहे व जनता हॉटेलने भाडेने घेतली जर जनता हॉटेल रोडमध्ये येत असेल तर सर्व प्रोसेस करावी लागेल. पेट्रोल पंपाची जागा ताब्यात घ्यावी. त्यानंतर जनता हॉटेलची जागे बाबत कार्यवाही करणे योग्य होइल.

मा.महापौर :मा.आयुक्त यांची तपासणी करीत आहे.

श्री.अफसर खान :माझे वार्डातील ओपनस्पेस हँडवर्क करीत नाही. मृत्यू झाला तर प्रेत नेता येत नाही. अशी परीस्थिती आहे. विद्यापीठ गेट ते मकईगेट मोबदला न देता १०० फुट रस्ता केला. अनेक अतिक्रमण करून लोक पुढे आले. कार्यवाही होत नाही.

मा.महापौर :श्री.अभंग यांनी कार्यवाही करावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :शासकीय जागा हस्तांतर करण्याची प्रोसेस काय असते. नियम काय असतो?

उपअभियंता-(न.र.) :शासकीय जागा शासनाकडून हस्तांतरीत करतो.

श्री.राजेंद्र जंजाळ :ही महसूलची जागा होती. याचा अर्थ शासनाची होती तर हस्तांतर केली होती का? त्या रस्त्यातील अतिक्रमण काढणेसाठी एक वेळेस मार्कींग करतो की दोन वेळेस. हा पण खुलासा करावा.

उपअभियंता-(न.र.) :या रस्त्यातील १०० फुटाची मार्कींग होती. त्यातील सर्व बांधकाम काढले हे एकच राहिले होते. ते काढण्यात आले. संचिकेमध्ये लिगल ओपनियन घेतले आहे. त्यांनी असे म्हटले की, कायदेशीर लिगल ओनर असेल भुसंपादन करण्याची गरज आहे. हे भोगवटादार कायदेशीर नव्हते म्हणून ते काढले.

श्री.राजेंद्र जंजाळ :ही शासकीय जागा होती. ती घेत असतांना शासनाला पत्र देऊन ताब्यात घेत असतो हे सत्यकी असत्य आहे?

उपअभियंता-(न.र.) :हे भोगवटादार अनधिकृत होते. त्यांचे फक्त बांधकाम काढले आहे. जागा ताब्यात घेणेसाठी कार्यवाही करावी लागेल.

श्री.राजेंद जंजाळ :विकास योजनेत बाधीत असल्यामूळे काढले. असे यापूर्वी म्हटले आता सांगतात की, अनाधिकृत होते म्हणून काढले. ज्यांची जागा होती त्याची तक्रार नव्हती तर मनपाने ते का पाडले. यापुर्वी इतर शासकीय जागा ताब्यात घेतांना शासनाच्या परवानगीने घेतली या जागेच्या बाबतीत परवानगी नसतांना कशी ताब्यात घेतली. तर संबंधीत अधिकारी यात दोषी नाहीत का? जी पध्दत प्रशासनाने या प्रकरणासाठी अवलंबीली ती कायदेशीर होती का? जर कायदेशीर नसेल तर नगररचनाचे संबंधीत व अतिक्रमणाचे अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी.

मा.महापौर :या प्रकरणात प्रश्नचिन्ह निर्माण झाले. शासकीय जमिनीचा विषय असेल अधिकारी तेथे गेले. शासकीय जमिनीवरील बांधकाम निष्काषीत करीत असतांना कायदेशीर काय प्रोसेस आहे. मा.आयुक्त तपासतील.

श्री.राजेंद्र जंजाळ :श्रीराम पवार मा.कोर्टात गेले होते. मा.कोर्टाने ही जागा ताब्यात घेताना प्रोसेस नुसार घ्यावी असे म्हटले. तसे या प्रकरणात प्रशासनाने केले का? ही जागा ताब्यात घेतांना जो कायदा नियम आहे. त्या बाबतचा अवलंब केला जातो तो केलेला नाही.

मा.महापौर :या बाबत मा.आयुक्त दोन दिवसात तपासणी करतील.

श्री.रामेश्वर भादवे :माझे वार्डात डीपी रोडवर अतिक्रमण झाले काढत नाही. दमडी महलच्या प्रकरणात जे दोषी असेल कार्यवाही करावी.

श्रीमती रेशमा कुरैशी :भगवान शिक्षक प्रशासन मंडळ यांनी अनाधिकृत बांधकाम केलेले आहे. अद्याप कार्यवाही केली नाही. भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही. एनओसी घेतली नाही.

मा.महापौर :हे प्रकरण शासनाकडे गेले होते. शासनाने आदेश दिले आहे. मा.आयुक्त तपासणी करीत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :आताच क्लीप बघीतली आहे. तेथे श्री.फेरोज खान, श्री.नासेर सिध्दीकी श्री. जमीर कादरी तसेच श्रीमती सरवत बेगम यांचे पती आरेफ हुसैनी तसेच श्रीमती साजेदा फारूकी यांचे पती श्री.सईद फारूकी हे सुध्दा तेथे होते. या सर्वांवर ॲक्ट नुसार सर्वावर पाच सदस्य व त्यांचे नातेवाईकावर कार्यवाही करावी. यांचे नगरसेवक पद रद्द करावे तसेच श्री.गफार कादरी यांनी सुध्दा मनपाचे अधिकारी यांना शिवीगाळ केली. त्यांचेवरही ३५३ नुसार गुन्हा दाखल करावा.

श्री.प्रमोद राठोड :अतिक्रमण विषयावर चर्चा केली माहिती घेतली. आताच सभागृहात क्लिप बघीतली. काही गोष्टी सदस्य वारंवार करीत आहे. एकदा चुक झाली पुन्हा होते तर त्यास माफी नसावी. श्री.फेरोज खान यांचे पद रद्द करणे संदर्भात शासनाकडे शिफारस केलेली आहे. परंत ते पुन्हा पुन्हा चुक करीत आहे. या पदाचा गैरवापर कसा करावा. हेच त्यांना कळते. त्यांचे नगरसेवक पद रद्द करणेसाठी शासनाकडे शिफारस करावी. तसेच इतर जे ही तेथे उपस्थित होते त्यांचे बाबतीतही कार्यवाही करावी. ज्या पध्दतीने ते अतिकमण काढले. ती पध्दत बरोबर नाही. अशाच पध्दतीने काम करणार असेल तर शहरातील सामाजिक संतुलन बिघडेल. श्री.अभंग व श्री.काझी यांची भुमिका काय होती? त्यांची चौकशी करावी. तसेच श्री.खरवडकर हे त्या ठिकाणी कोणते अधिकारी

म्हणून गेले होते? त्यांची भुमिका काय होती? मा.आयुक्तांनी चौकशी करून कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.इरशाद खान :ज्यांनी अतिक्रमण पाडण्यास विरोध केला काम थांबवून ठेवत होते त्यांचेवर ही कार्यवाही करावी.

श्री.विकास जैन :अतिक्रमण काढत असतांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप करणे नियमबाह्य आहे. त्या कायद्यानुसार गुन्हा आहे. हे अतिक्रमण काढत असतांना जे नगरसेवक प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे जे की त्यांचे नातेवाईक उपस्थित होते त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.उपमहापौर :शहरातील अतिक्रमण डीपी रस्ते असतील हॉकर्स झोन असतील त्यावर बैठक आयोजित केली. सर्वांचे मत लक्षात घेतले. दमडी महल येथील अतिक्रमण काढतांनाची चित्रफित बघीतली ज्या पध्दतीने घर पाडले ते योग्य नाही. त्या ठिकाणी अतिक्रमण काढत असतांना श्री.फेरोज खान, श्री.नासेर सिध्दीकी, श्री. जमीर कादरी तसेच श्रीमती सरवत बेगम यांचे पती आरेफ हुसैनी तसेच श्रीमती साजेदा फारूकी यांचे पती श्री.सईद फारूकी हे सुध्दा तेथे होते जाणीवपूर्वक तेथे जमाव गोळा करून एका व्यक्तीला टारगेट केले वेळ दिला नाही. शासकीय कामात अडथळा आणणे अधिकाऱ्यांवर दबाव आणणे अनधिकृत बांधकामाच्या मध्ये हस्तक्षेप करणे यामूळे त्यांनी नगरसेवक पदाचा गैरवापर केला आहे. अशा सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत निर्णय घ्यावा व शासनाकडे प्रस्ताव पाठवावा.

मा.महापौर :शहरातील विकास योजना रस्त्याने बाधीत मालमत्ता निष्काषीत करणे, रस्त्यावर अनाधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या हातगाड्यांवर तात्काळ प्रतिबंधात्मक कारवाई करणे, अनाधिकृत बांधकामाच्या विरुध्द तात्काळ कारवाई करणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीचे सदस्य श्री.राजगौरव वानखेडे, श्री.रूपचंद वाघमारे, श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे व श्री.सिध्दांत शिरसाट यांनी विशेष सभेची मागणी केल्यानंतर आजच्या सभेत आहे. या प्रस्तावावर सभागृहात बहुतांश स.सदस्यांनी केलेली चर्चा व सुचना विचारात घेऊन शहरातील डीपी रोडने बाधीत मालमत्ता विहीत प्रक्रियेचा अवलंब करून निष्काषीत करण्यात यावे. तसेच रस्त्यावर अनाधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या हातगाड्यांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात यावी. फेरीवाल्यांवर सद्यस्थितीत कागदावरच कार्यवाही होत असल्याचा आरोप होत आहे. गजानन महाराज मंदिर चौक, शहानुरमियाँ दर्गाह चौक, सेंट्रल नाका चौक, शहागंज चमन व परिसर व शहरातील अन्य बाजारपेठेमधील हातगाड्या व अनाधिकृत टपऱ्यांवर सातत्याने कार्यवाही सुरू ठेवावी. अनाधिकृत बांधकामाबाबतही कार्यवाही करावी. तसेच दिल्लीगेट ते हर्सुल महामार्गाचे दोन्ही बाजुचे अतिक्रमण काढण्यात यावे. सलिम-अली सरोवराच्या भोवताली झालेले अतिक्रमण काढण्यात यावे. डीपी रस्त्यावरील अतिक्रमण काढून अनाधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्यात यावे.

मा.उपमहापौर श्री.विजय औताडे यांनी दमडी महल येथील घर निष्काषीत करते वेळीच्या कारवाईची प्रशासनातर्फे तयार करण्यात आलेली

चित्रफित सभागृहात प्रोजेक्टरवर दाखविण्याची दिनांक ०५/०१/२०१८ रोजीच्या लेखी पत्राद्वारे मागणी केल्यानुसार सभागृहात सदर चित्रफित दाखविण्यात आलेली आहे. सदर कार्यवाहीची चित्रफित सभागृहात पाहताना सभागृहाच्या असे निदर्शनास आले आहे की, दमडी महल येथील घर पाडतांनाची कारवाई करतांना विरोधी पक्षनेता-श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, गटनेता-श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, नगरसेवक-श्री.जमीर अहेमद कादरी, नगरसेविका-श्रीमती सरवत बेगम यांचे पती श्री.आरेफ हुसैनी व नगरसेविका-श्रीमती साजेदा फारुखी यांचे पती श्री.सईद फारुखी यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी सर्व सामान्य नागरीकांसमोर असभ्य वर्तन केले असल्याचे सभागृहाचे मत आहे.

तसेच प्रत्यक्ष घटनाक्रम आणि सभागृहातील स.सदस्यांनी केलेली चर्चा आणि बहुसंख्य नगरसेवकांनी मांडलेले त्यांचे मत विचारात घेता हे सभागृह खालील निर्णयाप्रत आलेले आहे की, या सर्व प्रकरणात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १० (१-ड) च्या तरतुदींचे उल्लंघन झाले असून हे सभागृह बहुमताने हा ठराव मंजुर करते की, पालिका सदस्य तथा विरोधी पक्षनेता-श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, एमआयएम चे गटनेता- श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, नगरसेवक-श्री.जमीर अहेमद कादरी, नगरसेविका-श्रीमती सरवत बेगम यांचे पती श्री.आरेफ हुसैनी व नगरसेविका-श्रीमती साजेदा फारुखी यांचे पती श्री.सईद फारुखी यांनी अनधिकृत बांधकाम पाडून टाकत असताना त्याचे शासकीय कर्तव्य पार पाडीत असलेल्या सक्षम अधिका-याच्या कार्यवाहीत प्रत्यक्ष जागेवर जाऊन हस्तक्षेप केला असल्याचे चित्रफित पाहताना निदर्शनास येते. या कृतीमुळे मोहिमेमध्ये अडथळा आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे सदरील नगरसेवक नामे श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, श्री.जमीर अहेमद कादरी, श्रीमती सरवत बेगम व श्रीमती साजेदा फारुखी हे पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरत आहेत. ही अनर्हता सक्षम प्राधिकाऱ्याविरुध्द पालिका सदस्याने हस्तक्षेप केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २७/१२/२०१७ पासून त्यांचा पदावधी शिल्लक राहिपर्यंत असेल. प्रशासनाने याबाबत नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी.

प्रत्यक्ष कारवाईच्या वेळी घटनास्थळांवर जमावासमोर महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी असंसदीय भाषेत संभाषण केले असल्याचे चित्रफितीत दिसत आहे. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन हे विरोधीपक्ष नेता या पदावर असून त्यांनी पदीय कर्तव्य पार पाडत असतांना त्यांनी केलेले हे वर्तन अशोभनीय आहे. असे सभागृहाचे मत आहे. यापुर्वी देखील त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याच्या दालनात जाऊन प्रशासनाच्या कामात दबाव आणण्याचा प्रयत्न केला असल्याबाबतचे स.सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणुन दिले आहे. प्रसंगी अधिकाऱ्यांना शिवीगाळ करणे असे सातत्यपूर्ण गैरवर्तन केल्याचे सुध्दा निदर्शनास आलेले आहे. ज्याविरुध्द मनपा प्रशासनाने त्यावेळी कार्यवाही देखील केली होती.

दमडी महल येथील अतिक्रमण पाडण्याच्या कार्यवाहीत, शासकीय कामात अडथळा आणणे, अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे, अधिकाऱ्यांशी अशोभनीय वर्तन करणे, अनाधिकृत बांधकामाच्या कारवाईत हस्तक्षेप करणे, अशा प्रकारे श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, श्री.जमीर अहेमद कादरी यांनी नगरसेवक पदाचा गैरवापर केलेला आहे. तसेच श्रीमती सरवत बेगम व श्रीमती साजेदा फारुखी यांच्या पतीने कार्यवाही करतेवेळी हस्तक्षेप केला असल्याचे सभागृहाचे मत आहे.

मा.उपमहापौर-श्री.विजय साईनाथ औताडे, मा.सभागृहनेता-श्री.विकास जैन, सन्माननीय सदस्य श्री.राजु शिंदे, श्री.प्रमोद राठोड, श्री.राजेंद्र जंजाळ, श्री.राजगौरव वानखेडे, श्रीमती माधुरी देशमुख, श्रीमती शिल्पाराणी वाडकर, श्री.सिध्दांत शिरसाट, श्री.रामेश्वर भादवे यांच्यासह बहुतांश स.सदस्यांनी सभागृहात मांडलेले मत विचारात घेऊन, संपुर्ण सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हे सभागृह बहुमताने निर्णय घेत आहे की, प्रत्यक्ष कार्यवाहीच्या वेळी श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, श्री.जमीर अहेमद कादरी यांनी तसेच श्रीमती सरवत बेगम व श्रीमती साजेदा फारुखी यांच्या पतीने हस्तक्षेप केला असल्यामुळे हे सभागृह सर्व सदस्यांचे मत विचारात घेऊन व कायदेशीर बाबी तपासून असा निर्णय देत आहे की, सदरचे वर्तन हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम-१०(१-१अ) च्या तरतुदींचा भंग करणारे असून विरोधी पक्षनेता-श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, गटनेता- श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, पालिका सदस्य श्री.जमीर अहेमद कादरी, श्रीमती सरवत बेगम व श्रीमती साजेदा फारुखी हे पद धारण करीत असताना तिचे पदीय कर्तव्य पार पाडताना गैरवर्तणुक केलेली आहे. तसेच अशोभनीय व बेशिस्त वर्तनाबद्दल दोषी आढळून येत असल्याचे सभागृहात उपस्थित बहुसंख्य स.सदस्यांचे मत आहे. करीता त्यांच्या पालिका सदस्य म्हणून असलेल्या उर्वरीत कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरविण्याकरीता प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३(१)(अ) आणि १३(२) च्या तरतुदीनुसार कायदेशीर प्रक्रीया पूर्ण करुन शासनाकडे अहवाल पाठवावा, अशी शिफारस करण्यात येत आहे.

**ठराव:-**

स्थायी समितीचे सन्माननीय सदस्य श्री.राजगौरव वानखेडे, श्री.रूपचंद वाघमारे, श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे व श्री.सिध्दांत शिरसाट यांनी विशेष सभेची मागणी केल्यानुसार “शहरातील विकास योजना रस्त्याने बाधीत मालमत्ता निष्काषीत करणे, रस्त्यावर अनाधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या हातगाड्यांवर तात्काळ प्रतिबंधात्मक कारवाई करणे, अनाधिकृत बांधकामाच्या विरुध्द तात्काळ कारवाई करणे” बाबतचा विषय आजच्या सभेत होता. सभागृहात स.सदस्यांनी केलेली चर्चा व सुचना विचारात घेऊन शहरातील डीपी रोडने बाधीत मालमत्ता विहीत प्रक्रियेचा अवलंब करून निष्काषीत करण्यात यावे. तसेच रस्त्यावर अनाधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या हातगाड्यांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात यावी. फेरीवाल्यांवर सद्यस्थितीत कागदावरच कार्यवाही होत असल्याचा आरोप होत आहे. गजानन महाराज मंदिर चौक, शहानुरमियाँ दर्गाह चौक, सेंट्रल नाका चौक, शहागंज चमन व परिसर व शहरातील अन्य

बाजारपेठेमधील हातगाड्या व अनाधिकृत टपऱ्यांवर सातत्याने कार्यवाही सुरू ठेवावी. अनाधिकृत बांधकामाबाबतही कार्यवाही करावी. तसेच दिल्लीगेट ते हर्सुल महामार्गाचे दोन्ही बाजुचे अतिक्रमण काढण्यात यावे. सलिम-अली सरोवराच्या भोवताली झालेले अतिक्रमण काढण्यात यावे. डीपी रस्त्यावरील अतिक्रमण काढून अनाधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्यात यावे.

मा.उपमहापौर श्री.विजय औताडे यांनी दमडी महल येथील घर निष्काषीत करते वेळीच्या कारवाईची प्रशासनातर्फे तयार करण्यात आलेली चित्रफित सभागृहात प्रोजेक्टरवर दाखविण्याची दिनांक ०५/०१/२०१८ रोजीच्या लेखी पत्राद्वारे मागणी केल्यानुसार सभागृहात सदर चित्रफित दाखविण्यात आलेली आहे. सदर कार्यवाहीची चित्रफित सभागृहात पाहताना सभागृहाच्या असे निदर्शनास आले आहे की, दमडी महल येथील घर पाडतांनाची कारवाई करतांना विरोधी पक्षनेता-श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, गटनेता- श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, नगरसेवक-श्री.जमीर अहेमद कादरी, नगरसेविका-श्रीमती सरवत बेगम यांचे पती श्री.आरेफ हुसैनी व नगरसेविका-श्रीमती साजेदा फारुखी यांचे पती श्री.सईद फारुखी यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी सर्व सामान्य नागरीकांसमोर असभ्य वर्तन केले असल्याचे सभागृहाचे मत आहे.

तसेच प्रत्यक्ष घटनाक्रम आणि सभागृहातील स.सदस्यांनी केलेली चर्चा आणि बहुसंख्य नगरसेवकांनी मांडलेले त्यांचे मत विचारात घेता हे सभागृह खालील निर्णयाप्रत आलेले आहे की, या सर्व प्रकरणात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १० (१-ड) च्या तरतुदींचे उल्लंघन झाले असून हे सभागृह बहुमताने हा ठराव मंजुर करते की, पालिका सदस्य तथा विरोधी पक्षनेता-श्री.खान फेरोज मोईनुद्यीन, एमआयएम चे गटनेता- श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, नगरसेवक-श्री.जमीर अहेमद कादरी, नगरसेविका-श्रीमती सरवत बेगम यांचे पती श्री.आरेफ हुसैनी व नगरसेविका-श्रीमती साजेदा फारुखी यांचे पती श्री.सईद फारुखी यांनी अनधिकृत बांधकाम पाडून टाकत असताना त्याचे शासकीय कर्तव्य पार पाडीत असलेल्या सक्षम अधिकाऱ्याच्या कार्यवाहीत प्रत्यक्ष जागेवर जाऊन हस्तक्षेप केला असल्याचे चित्रफित पाहताना निदर्शनास येते. या कृतीमुळे मोहिमेमध्ये अडथळा आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे सदरील नगरसेवक नामे श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, श्री.जमीर अहेमद कादरी, श्रीमती सरवत बेगम व श्रीमती साजेदा फारुखी हे पालिका सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरत आहेत. ही अनर्हता सक्षम प्राधिकाऱ्या विरुध्द पालिका सदस्याने हस्तक्षेप केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २७/१२/२०१७ पासून त्यांचा पदावधी शिल्लक राहिपर्यंत असेल. प्रशासनाने याबाबत नियमानुसार वैधानिक कार्यवाही करावी.

प्रत्यक्ष कारवाईच्या वेळी घटनास्थळांवर जमावासमोर महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी असंसदीय भाषेत संभाषण केले असल्याचे चित्रफितीत दिसत आहे. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन हे विरोधीपक्ष नेता या पदावर असून त्यांनी पदीय कर्तव्य पार पाडत असतांना त्यांनी केलेले हे वर्तन अशोभनीय आहे. असे सभागृहाचे मत आहे. यापुर्वी देखील त्यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याच्या दालनात जाऊन प्रशासनाच्या कामात दबाव आणण्याचा प्रयत्न केला असल्याबाबतचे स.सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणुन दिले आहे. प्रसंगी अधिकाऱ्यांना शिवीगाळ करणे असे सातत्यपूर्ण गैरवर्तन केल्याचे सुध्दा निदर्शनास आलेले आहे. ज्याविरुध्द मनपा प्रशासनाने त्यावेळी कार्यवाही देखील केली होती.

दमडी महल येथील अतिक्रमण पाडण्याच्या कार्यवाहीत, शासकीय कामात अडथळा आणणे, अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे, अधिकाऱ्यांशी अशोभनीय वर्तन करणे, अनाधिकृत बांधकामाच्या कारवाईत हस्तक्षेप करणे, अशा प्रकारे श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, श्री.जमीर

अहेमद कादरी यांनी नगरसेवक पदाचा गैरवापर केलेला आहे तसेच श्रीमती सरवत बेगम व श्रीमती साजेदा फारुखी यांच्या पतीने कार्यवाही करतेवेळी हस्तक्षेप केला असल्याचे सभागृहाचे मत आहे.

मा.उपमहापौर-श्री.विजय साईनाथ औताडे, मा.सभागृहनेता-श्री.विकास जैन, सन्माननीय सदस्य श्री.राजु शिंदे, श्री.प्रमोद राठोड, श्री.राजेंद्र जंजाळ, श्री.राजगौरव वानखेडे, श्रीमती माधुरी देशमुख, श्रीमती शिल्पाराणी वाडकर, श्री.सिध्दांत शिरसाट, श्री.रामेश्वर भादवे यांच्यासह बहुतांश स.सदस्यांनी सभागृहात मांडलेले मत विचारात घेऊन, संपुर्ण सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हे सभागृह बहुमताने निर्णय घेत आहे की, प्रत्यक्ष कार्यवाहीच्या वेळी श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, श्री.जमीर अहेमद कादरी यांनी तसेच श्रीमती सरवत बेगम व श्रीमती साजेदा फारुखी यांच्या पतीने हस्तक्षेप केला असल्यामुळे हे सभागृह सर्व सदस्यांचे मत विचारात घेऊन व कायदेशीर बाबी तपासून असा निर्णय देत आहे की, सदरचे वर्तन हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम-१०(१-१अ) च्या तरतुदींचा भंग करणारे असून विरोधी पक्षनेता-श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, गटनेता- श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन, पालिका सदस्य श्री.जमीर अहेमद कादरी, श्रीमती सरवत बेगम व श्रीमती साजेदा फारुखी हे पद धारण करीत असताना तिचे पदीय कर्तव्य पार पाडताना गैरवर्तणुक केलेली आहे. तसेच अशोभनीय व बेशिस्त वर्तनाबद्दल दोषी आढळून येत असल्याचे सभागृहात उपस्थित बहुसंख्य स.सदस्यांचे मत आहे. करीता त्यांच्या पालिका सदस्य म्हणून असलेल्या उर्वरीत कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरविण्याकरीता प्रशासनाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १३(१)(अ) आणि १३(२) च्या तरतुदीनुसार कायदेशीर प्रक्रीया पूर्ण करुन शासनाकडे अहवाल पाठवावा, अशी शिफारस करण्यात येत आहे. त्यास बहुमताने मंजुरी देण्यात आली. वैधानिक कार्यवाही करावी.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद